# प्रेस नोट

## महावितरणच्या उप व्यवस्थापक व कनिष्ठ लिपीक यांचेवर २,५०,०००/- रुपयांची लाच स्विकारताना अॅन्टी करप्शन ब्युरो, नागपूरने केली कारवाई.

महावितरणचे उप व्यवस्थापक व कनिष्ठ लिपीक यांनी तक्रारदार यांचे मेडिकल बिल मंजुर करणेकरीता आणि मिळालेल्या एरियर्सच्या रक्कमेचे मोबदल्यात २,५०,०००/- रुपयांची लाच मागणी करून स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूरने यशस्वी सापळा रचून आरोपीस ताब्यात घेतले आहे.

प्रकरणातील तक्रारदार हे हिंगणा एम.एस.ई.बी. ऑफिस येथे वरिष्ठ तंत्रज्ञ म्हणून कार्यरत आहेत. कर्तव्यावर असताना झालेल्या एका अपघातात त्यांचा उजवा हात कापला गेला होता. त्याचे प्रलंबित मेडिकल बिल मंजूर करणे तसेच त्यांना मिळालेल्या एरियर्सच्या रक्कमेच्या मोबदल्यात आरोपी लोकसेवक १) श्री. गणेश नथुजी डोरले, वय ५१ वर्षे, उप व्यवस्थापक (वर्ग-२), मानव संसाधन विभाग, MSEDCL सातगाव बुटीबोरी व २) श्री. सुमित रेवतकर, कनिष्ठ लिपिक (वर्ग-३), मानव संसाधन विभाग, MSEDCL सातगाव बुटीबोरी यांनी २,५०,०००/- रुपये लाचेची मागणी केली असल्याची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर येथे दिली.

दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाद्वारे सापळा पडताळणी करण्यात आली असता, दोन्ही आरोपी लोकसेवक यांनी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. आज दिनांक ०२/०४/२०२६ रोजी आरोपी लोकसेवक श्री. गणेश डोरले, उप व्यवस्थापक यांनी लाचेची रक्कम घेण्यासाठी तक्रारदाराच्या घरी जाण्याचे ठरविल्याने सापळा कारवाई दरम्यान तक्रारदाराच्या राहत्या घरी हॉलमध्ये पंच क्रमांक १ यांच्या समक्ष आरोपी लोकसेवक २,५०,०००/- रुपयांची लाच स्विकारली. आरोपी लोकसेवक यांना ताब्यात घेण्यात आले आहे. तसेच आरोपी लोकसेवक श्री. सुमित रेवतकर, कनिष्ठ लिपिक यांनी पडताळणी दरम्यान लाचेची मागणी केली असल्याने त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन एमआयडीसी, नागपूर शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदर यशस्वी सापळा कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर चे पोलीस अधीक्षक डॉ. श्री. दिगंबर प्रधान, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी बाविस्कर आणि श्री. विजय माहुलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. सदर सापळा कारवाई ही पोलीस निरीक्षक श्री. मयुर चौरसिया, पोहवा भरत ठाकुर, पोहवा अनिल बहिरे, पोहवा उपेंद्र आकोटकर, मपोहवा कांचन गुलबासे, पोशि. विकेश राउत आणि चापोशि प्रिया नेवारे सर्व नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर यांनी केलेली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे जनतेला आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कामासाठी कोणाही लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्यांच्या विरुद्ध निर्भयपणे पुढे येऊन तक्रार नोंदवावी.

**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे खालील क्रमांकावर संपर्क साधावा**

१. पोलीस अधीक्षक कार्यालय दुरध्वणी क्र. 0712-2561520,
२. टोल फ्री क्रमांक : १०६४ / व्हॉटसॲप क्र. 9067671064
३. डॉ. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो. क्र. 9923185566
४. श्रीमती माधुरी बाविस्कर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो. क्र. 7038436441
५. श्री. विजय माहुलकर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो. क्र. 9923142569
६. श्री. राजीव कर्मलवार, पोलीस निरीक्षक, वाचक लाप्रवि नागपूर मो. क्र. 9021452760